
शासनमान्य यादीतील क्रमांक ११२६/२००६

# हसणावळ

संकलन

डॉ. पवन मांडवकर



आदित्य प्रकाशन
अमर प्रकाश कदम
'शालीन', रामकृष्ण परमहंस सोसायटी
शंभर फुटी रोड, सांगली
मोबा.नं. ९८३४८७५५८०

हसणावळ
[Hasnawal] (Marathi)

© डॉ. पवन मांडवकर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
(Dr. Pavan Mandavkar)

प्रकाशन २०२२
प्रथमावश्ती प्रती १०००

प्रकाशक
आदित्य प्रकाशन
अमर प्रकाश कदम
'शालीन', रामकृष्ण परमहंस सोसायटी
शंभर फुटी रोड, सांगली
मोबा.नं. ९८३४८७५५८०

मुद्रक
दमयंती एजन्सी, कोल्हापूर

अक्षर जुळवणी
ओम ग्राफिक्स, कोल्हापूर

**ISBN 978-81-925945-5-2**

मूल्य ८० रुपये

# हसणावळ

रामू आणि शामू दोघेही सख्खे भाऊ. रामूने तीन लाडू आणले. शामू त्याला लाडू मागू लागला. रामूने शामूला एक लाडू दिला व स्वतः दोन लाडू खाल्ले. तेव्हा रागावून शामू म्हणाला, “किती रे तू स्वार्थी! मी तुझ्या जागी असतो, तर एक लाडू स्वतः घेतला असता आणि दोन तुला दिले असते.”

त्यावर रामू म्हणाला, “मीही तर तेच केलंय.”

ßßß

गणपतराव दुकानात गेले आणि त्यांनी एक नवीन छत्री खरेदी केली. त्यांनी दुकानदाराला छत्रीला एक भोक पाडून मागितले.

“छत्रीला भोक? का बरं?” दुकानदाराने आश्चर्याने विचारले.

“छत्रीला भोक असल्याशिवाय पाऊस पडतोय की नाही, ते मला कसे कळणार?” गणपतराव उत्तरले.

ßßß



पार्टी आटोपल्यावर तिघेहीजण अडखळत, झोकांड्या खात एका घरापुढे थांबले. एकाने विचारले, “शंकररावांचे घर हेच का?”

“हो, हे त्यांचेच घर; पण ते अजून घरी आले नाहीत.” आतून आवाज आला. तो आवाज ऐकून एकजण म्हणाला, “अच्छा मित्रांनो, माझं घर तर सापडलं. मी जातो आत झोपायला.”

ßßß

बोदुकलेबुवा आपल्या नव्या पोपटाला ‘हॅलो हॅलो’ म्हणायला शिकवत होते. पोपट काही बोलायच्या मूडमध्ये नव्हता. पुष्कळ वेळ प्रयत्न करूनही पोपट बोलत नाही, हे पाहून बोदुकलेबुवांनी चिडून म्हटले, “आता हॅलो म्हणतोस की काढू कानाखाली आवाज?”

पोपटही चिडून ओरडला, “रॉंग नंबर.”

ßßß

दूरदृष्टीकरिता प्रसिद्ध गुंडोपंत रस्त्यात पडलेल्या केळीच्या सालीवरून घसरून पडले. दुसऱ्या दिवशी ते फिरायला गेले, तेव्हा पुन्हा केळीची साल पडलेली दिसली. गुंडोपंतांचा चेहरा त्रासिक झाला. त्यांच्या मित्राने त्यांना विचारले,

“एवढा त्रासिक चेहरा करायला काय झालं?”

“कालच अंग शेकून घेतलं. ते निस्तारतोय, तोपर्यंत आज मी पुन्हा पडणार.” गुंडोपंत उत्तरले.

ꙮꙮꙮ

गुणवंतराव मोटार चालवीत असताना अचानक पुढ्यात आलेल्या एका बालसायकलस्वारामुळे त्यांना करकचून ब्रेक मारावे लागले. परिणामी मागून आलेल्या मोटारीची त्यांच्या मोटारीला धडक बसली. गुणवंतराव मोटारीतून खाली उतरेपर्यंत बालसायकलस्वार पसार झाला. दोन्ही मोटारचालक नुकसानीचा हिशोब लावू लागले.

“मी त्या बदमाश कार्ट्यास पकडू शकलो असतो तर...” गुणवंतराव रागारागात बडबडत होते.

“जाऊ द्या हो. ते बदमाश पोरगं कुठल्याकुठे पळून गेलं असेल.” दुसरा मोटार मालक म्हणाला.

“पळू द्या हो, किती पळायचं ते. रात्री तर कार्ट घरी येईलच ना!” गुणवंतरावांमधला बाप उत्तरला.

ꙮꙮꙮ

“सांगा बरं मुलांनो, बैलगाडीचालक बैलांच्या गींयात घंटा का बांधतात?” गुरुजींनी विचारले.

“कारण त्यांच्या बैलगाडीचे हॉर्न बिघडले असतात. ” राजूने उत्तर दिले.

ꙮꙮꙮ



एका मुलीला तीन केस असतात. ती आपल्या बहिणीला म्हणते, “मला वेणी घालून दे ना!”

तिची बहीण वेणी घालत असताना एक केस तुटतो. तेव्हा ती मुलगी म्हणते, “जाऊ दे बाई, मला दोन वेण्या घालून दे.”

वेणी घालताना पुन्हा एक केस तुटतो. पुन्हा ती मुलगी म्हणते, “जाऊ दे बाई, मला अंबाडा पाडून दे.”

अंबाडा पाडताना शेवटचा केसही तुटतो. तेव्हा ती मुलगी म्हणते, “शी बाई, मी केस मोकळेच ठेवते.”

ꙮꙮꙮ

विविधोपयोगी स्वदेशी वस्तूंचे प्रदर्शन लागले होते. सखूने प्रदर्शन पाहिले आणि शेवटच्या टेबलवर ठेवलेल्या अभिप्राय पुस्तकातील काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा आग्रह आयोजकांनी केल्यावर सखूने अभिप्राय दिला. त्यात एक प्रश्न होता की, आपण या प्रदर्शनास येण्याचे कारण? सखूने उत्तर लिहिले, ‘बाहेर मुसळधार पाऊस सुरू झाला होता.’

ꙮꙮꙮ

एक कंजूष पत्नी कंजूष पतीला म्हणते, “अहो, आपल्या कंगव्याचा एक दात तुटला बरं का! आता एक

नवीन कंगवा विकत आणा.”

त्यावर पती चिडून म्हणतो, “केवळ एका दातासाठी तू नवा कंगवा आणायला सांगतेस?”

“अहो, तो त्या कंगव्याचा उरलेला शेवटचा दात होता.” पत्नी उत्तर देते.

ठठठ

शालीकराव आपल्या पत्नीवर ओरडत होते, “तू मला कुत्रा म्हणालीस, हे मी कानांनी ऐकलंय.”

“छे हो, मी तुम्हाला कुत्रा म्हटलेलं नाही. आता कृपाकरून भुंकणं बंद करा.” पत्नी उत्तरली.

इइइ

पतीला रुग्णालयातून सुटी देताना पत्नीला डॉक्टरसाहेबांनी सांगितले, “बाई, तुमच्या पतीच्या प्रकृती सुधारणेसाठी मी या झोपेच्या गोेंया देतो आहे.”

“त्यांना केव्हा आणि किती गोेंया द्यायच्या?”

“ह्या गोेंया त्यांना नाही द्यायच्या, तुम्ही घ्यायच्या.”

ठठठ

न्यायाधीश आरोपीला समजावत म्हणतात, “तुम्ही तुमचा वाद आपापसात कोर्टाबाहेर का मिटवत नाहीत?”

“तेच करत होतो साहेब, पण पोलीसांनी आम्हाला



इथे आणलं.” आरोपीने उत्तर दिलं.

ठठठ

नव्यानेच विवाहबद्ध झालेली पत्नी पतीला जेवावयास वाढते. भोजन फारच तिखट असल्याने पतीच्या डोेंयांतून पाणी येतं. पत्नी विचारते, “स्वयंपाक कसा झालाय?”

“अतिशय छान झालाय.”

“मग तुमच्या डोेंयांतून पाणी का?”

“हे आनंदाश्रू आहेत.” पती उत्तर देतो.

ठठठ

सरदारजींची सभा भरलेली असते. विषय असतो की सर्वजण आपल्याला बुद्धू का म्हणतात? दिवसभर चर्चा करूनही उत्तर सापडत नाही. एक सरदारजी चहा प्यायला बाहेरच्या टपरीवर जातो. चहावाला सहज विचारतो, की आत कसली सभा सुरू आहे? सरदारजी आपला गहन प्रश्न त्याला सांगतो. चहावाला म्हणतो, “तुम्ही जर माझ्या सोप्या प्रश्नाचं उत्तर दिलं, तर तुम्ही बुद्धू नाही.”

“कोणत्या प्रश्नाचं उत्तर?” सरदारजी विचारतो.

“माझ्या घरात तीन माणसं आहेत. एक माझी पत्नी, दुसरा माझा मुलगा आणि तिसरा कोण?”

सरदारजी खूप विचार करतो; पण त्याला उत्तर

येत नाही. शेवटी तो म्हणतो,

"हरलो बुवा. तूच सांग आता उत्तर."

"तिसरा मी." चहावाला हसत म्हणतो.

"अरे, हे तर खूपच सोपं आहे. मी आत जातो आणि माझ्या मित्रांना विचारतो. त्यांना जर उत्तर बरोबर आलं. तर आम्ही सरदारजी बुद्धू नाही."

सरदारजी आत जाऊन आपल्या बांधवांना प्रश्न करतो, "सांगा बरं, माझ्या घरात तीन माणसं आहेत. एक माझी पत्नी, दुसरा माझा मुलगा आणि तिसरा कोण?"

सगळे सरदारजी खूप विचार करतात; पण त्यांना उत्तर येत नाही. शेवटी ते म्हणतात,

"हरलो बुवा. तूच सांग आता उत्तर."

"तिसरा तो बाहेरचा चहावाला." सरदारजी मोठ्या उत्साहात सांगतो.

ꕥꕥꕥ

छुंदा आणि कुंदाची खूप दिवसांनी भेट झाली. छुंदाच्या अंगावरचे दागदागिने पाहून कुंदाने विचारलं,

"काय गं, चांगली नोकरी लागलेली दिसतेय?"

"छे गं, नोकरी चांगली नाही, नवरा चांगला भेटलाय." छुंदा उत्तरली.

ꕥꕥꕥ



एक पुरुषांची पाकक्रिया स्पर्धा सुरू असते. गॅसच्या शेगड्यांवर पातेल्यांमध्ये, कढयांमध्ये, तव्यावर कोणी इडली बनवत असतं, कोणी दोसा तर कोणी गाजर हलवा. एक सरदारजी मात्र गॅस शेगडीच्या वर कढई न ठेवता खाली ठेवून त्यात चमचा हलवत असतो. परीक्षक प्रत्येकाला हिंदीत विचारतात, "आप क्या बना रहे है?"

"मै गाजर हलवा बना रहा हूँ." एक म्हणतो.

"मै मसाला दोसा बना रहा हूँ." दुसरा म्हणतो.

"मै इडली बना रहा हूँ." तिसरा म्हणतो.

परीक्षक सरदारजीला विचारतात,

"गॅस के नीचे कढाई रखके आप क्या बना रहे है ?"

"मै उल्लू बना रहा हूँ." सरदारजी उत्तरतो.

ꕥꕥꕥ

हृदयरोगी व्यापाऱ्यावर उपचार सुरू असताना डॉक्टरांनी सांगितलं, "तुम्हाला हृदय बदलावं लागेल."

"त्याकरिता किती खर्च येईल, डॉक्टरसाहेब?"

"ऑपरेशनचा खर्च नेहमीचाच येईल; पण हृदयाची किंमत वेगवेगळी असते. डॉक्टरचं हृदय हवं असेल, तर पन्नास हजार रुपये, प्राध्यापकाचं सत्तर हजार तर वकिलाचं हृदय एक लाखात मिळेल." डॉक्टरांनी सांगितलं.

"वकिलाचं हृदय इतकं महाग का?" व्यापाऱ्याने

विचारलं.

"कारण वकिलाचं हृदय दुर्मिळ असतं. सहसा वकिलांना हृदय नसतंच." डॉक्टरांनी खुलासा केला.

इइइ

गोटूचे तिच्यावर प्रेम बसले. तिचा बाप कडक स्वभावाचा डॉक्टर होता. गोटू तिला दररोज एक सफरचंद भेट द्यायचा. त्याचा हा उद्योग तिला फारच बोर वाटला. तिने त्याला एक दिवस चांगलेच झापले आणि विचारले, "तू मला रोज एक सफरचंद का पाठवतोस?"

"अग, तुला भेटायचं म्हणजे, तुझ्या बापाला दूर करायला नको का? 'ॲन ॲपल ए डे, किप्स अ डॉक्टर अवे'. रोज एक सफरचंद डॉक्टरला दूर ठेवते." गोटूने भाषांतरासहित उत्तर दिले.

ꝏꝏꝏ

कल्लू आईबाबांसह सहलीला गेला होता. तलावात बाबा उतरले आणि पोहू लागले. कल्लूलाही पोहायची इच्छा झाली. त्याने आईला विचारले, "आई, मी पण पाण्यात जाऊ?"

त्यावर आई म्हणाली, "नकोरे बाबा. पाणी खूप खोल आहे."

"मग बाबा कसे उतरले?"



"अरे, त्यांचा विमा उतरलाय!" आईने खुलासा केला.

ꝏꝏꝏ

घोड्यावर स्वार होऊन निघालेल्या बंडोपंतांना रस्त्यात आमराई लागली. आंबे न्याहाळत एका झाडाखालून जाताना त्यांना हाताच्या उंचीवर एक आंबा दिसला. उंच होऊन तो तोडण्याच्या प्रयत्नात घोड्यावरून त्यांचा ताबा सुटला आणि घोडा पुढे निघून गेला. झाडाची फांदी पकडून बंडोपंत बराच वेळ लटकून राहिले. खाली उडी मारण्याची हिंमत होईना. तोच रखवालदार आला. वर बघत त्याने विचारले, "हा काय खेळ लावलाय?"

"खेळ कसला? घोड्यावरनं घसरलोय मी. दिसत नाही का?" बंडोपंतांनी खुलासा केला.

ꝏꝏꝏ

स्मशानातील एका थडग्यापाशी एक माणूस खूप वेळ आक्रोश करीत होता, "का मेलास तू? तू मरायला नको होतंस."

त्याचा आक्रोश ऐकून स्मशानातील इतर माणसे गोळा झाली. "तुमचा फार जवळचा माणूस गेला वाटतं. कोण होता तो?"

"माझ्या पत्नीचा पहिला पती." अश्रू ढाळत तो म्हणाला.

ՁՁՁ

जपानचे शिष्टमंडळ बिहारच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांनी लालू-राबडीला म्हटले, "तुम्ही आम्हाला तुमचा प्रदेश दोन वर्ष ताब्यात द्या. आम्ही त्याचा जपान करून दाखवू."

लालू-राबडी हसले आणि म्हणाले, "तुम्ही तुमचा जपान दोन दिवस आमच्या ताब्यात द्या. आम्ही त्याचा बिहार करून दाखवू."

ՁՁՁ

दारू पिऊन गोंधळ घालत जाणाऱ्या तळीरामला पकडून पोलीसांनी ठाणेदारापुढे उभे केले.

"पुन्हा आणला का ह्याला. आज जास्तीच चढलेली दिसतेय. जरा उतरल्यावरच घेऊन या." ठाणेदाराने सांगितलं.

"तेच सांगत होतो साहेब मी यांना. पिऊन कामं करत जाऊ नका. त्रास होईल. पण ऐकायला शुद्धीवर असावेत ना?" तळीराम म्हणाला.

ՁՁՁ

"माझी बायको माझ्यासाठी आपण होऊन सिग्रेटी



मागवून देते." अघळराव सांगत होते.

"अरे व्वा! फार प्रेम दिसतंय तुमच्यावर तुमच्या बायकोचं!" पघळरावांनी कौतुकाने म्हटलं.

"छे हो, काही दिवसांपूर्वीच तिने वाचलंय की एक सिग्रेट माणसाचं आयुष्य नऊ मिनिटांनी कमी करते." अघळरावांनी खुलासा केला.

ՁՁՁ

एका दारुड्या पतीने घरात शिरताच पत्नीला शंका येऊ नये म्हणून हातात पुस्तक घेऊन तोंडापुढे धरून मोठमोठ्याने वाचण्यास सुरुवात करायचे ठरवले. पत्नी स्वयंपाक घरातून आली आणि ओरडली, "पुन्हा ढोसून आलात?"

"छे छे, कुठे घेतलीय?" पती म्हणाला.

"मग सुटकेस उघडून तोंडापुढे धरून कसली बडबड लावलीय?" पत्नीने विचारलं.

ՁՁՁ

हिंदीचे शिक्षक वर्गात शिकवत असतात.

"बच्चो, दिल्लीमें कुतुबमिनार है."

एक विद्यार्थी पेंगत असतो. त्याला रागवत ते म्हणतात,

"अभी मैने क्या बताया?"

"सर, आपने बताया की दिल्लीमें कुत्ता बिमार है." विद्यार्थी उत्तरतो.

ꝋꝋꝋ

पहिला दारूडा :- मला असं वाटतं की, माझ्याजवळ दहा हत्ती विकत घेता येतील इतके पैसे असावे.
दुसरा दारूडा :- अरे पण दहा हत्ती घेऊन तू करशील काय?
पहिला दारूडा :- हत्ती कोण विकत घेतोय? पण तितके पैसे असावेत, असं मला वाटतंय.

ꝋꝋꝋ

"बाबा, वेड्या माणसांना कसं पकडतात?" चिंटूने विचारले.

"कसं म्हणजे काय? पावडर लावून, केस मोकळे सोडून आणि थोडसं हसून." बाबांनी उत्तर दिले.

ꝋꝋꝋ

मुलाखत सुरू होती. गप्पीदासांना कोणताही प्रश्न विचारला, तरी उत्तर तयार होते. प्रश्न विचारणाऱ्यांना काय प्रश्न विचारावा, हा प्रश्न पडला होता. शेवटी बराच विचार करून एकाने विचारले, "सूर्य आपल्यापासून किती



अंतरावर आहे?"

गप्पीदासांनी उत्तर दिले, "अगदी पुरेशा अंतरावर आहे. त्याचा माझ्या निवडीला काहीही ताप होणार नाही, अशी माझी खात्री आहे."

ꝋꝋꝋ

काळूराम आणि बाळूराम जंगलातून जात असताना अचानक वाघ समोर आला. काळूरामने लगेच धोतराचा काचा मारला आणि पळण्याची तयारी केली. बाळूरामने लगेच विचारले, "अरे काळूराम, तू काय वेडा आहेस? वाघापेक्षा तू काय वेगाने पळू शकशील?"

"मित्रा, खरं आहे तुझं. वाघापेक्षा मी जोरात पळू शकलो नाही तरी तुझ्यापेक्षा निश्चितच वेगाने पळू शकेन, हे पुरेसं नाही का?" काळूरामने खुलासा केला.

ꝋꝋꝋ

जीवनाच्या एकसुरीपणाला कंटाळलेला एक बेडूक ज्योतिष्याकडे गेला. त्याचा पाय पाहून ज्योतिष्याने सांगितलं, "तू भाग्यवान असून लवकरच तुझ्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन होणार आहे. एक सुंदर अशी मुलगी तुझ्या जीवनात येणार आहे."

आनंदाने बेडकाने विचारले, "खरंच! कुठे भेटेल

ती?”

“वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत.” ज्योतिष्याने थंडपणे सांगितलं.

ൎൎൎ

मदिराप्राशन केल्यावर घरी परतताना भदाचे पैसे पडले. घरी पोचल्यावर सदा भदाला म्हणाला, “चल, तुझे हरवलेले पैसे या खोलीत शोधू.”

“पैसे या खोलीत नाही सापडले तर?”

“मग दुसऱ्या खोलीत शोधू.”

“दुसऱ्याही खोलीत नाही सापडले तर?”

“मग तिसऱ्या खोलीत शोधू.”

“आणि तिसऱ्याही खोलीत नाही सापडले तर?”

“मग नवीन खोली बांधून त्यात शोधू.”

ൎൎൎ

प्राध्यापक घोटाळे वर्गात शिरले आणि प्राणिशास्त्राच्या विद्यार्थ्यांना म्हणाले, “आज आपण बेडूक या प्राण्याचा अभ्यास करणार आहोत. मी खास तुमच्या प्रात्यक्षिकासाठी बेडूक पकडून आणलाय.”

प्राध्यापक महोदयांनी पँटच्या खिशात हात घातला आणि बनपाव बाहेर काढला. विद्यार्थी हसायला लागताच



त्यांनी हाताकडे बघत म्हटले, “अरेच्चा, मग ब्रेकफास्टमध्ये मी हा बनपाव खाल्लाच नाही, तर काय खाल्लं?”

ൎൎൎ

रटाळ कीर्तन आटोपले. कीर्तनकाराने डोळे उघडून समोर पाहिले, तर केवळ एकच माणूस बसून आणि तोही ढसाढसा रडतोय. कीर्तनकाराने म्हटलं, “तुम्हाला माझं कीर्तन फारच आवडलेलं दिसतंय. फारच भावूक झालात तुम्ही.”

“छे हो बुवा. माझा बोकूड हरवलाय, त्याचं रडं येतंय मला.”

“पण बोकड हरवल्याचं रडू आत्ता कीर्तनात?”

“माह्या बोकडाची दाडीबी तुमच्यासारखीय हाय.”

ൎൎൎ

गोंधळे रस्त्याने जात असतना भिकाऱ्याने हटकले, “अहो साहेब तुमचे पैशाचे पाकीट रस्त्यावर पडले का?”

गोंधळेंनी खिशात हात घालून पाकीट बाहेर काढून तपासून घेतले आणि म्हणाले, “माझे पाकीट तर खिशातच आहे.”

“मग त्यातला एक रुपया द्या ना.”

ൎൎൎ

"काय चंपकलाल, हाताला प्लास्टर कशाचे?"
"अपघात झाला होता स्कूटरला."
"कधी?"
"सहा महिन्यांपूर्वी."
"मग अजूनही प्लास्टर?"
"हो, डॉक्टरांना गरज वाटत नाही; पण वकिलाने सांगून ठेवलंय की जोपर्यंत इन्शुरन्सचा पैसा येत नाही तोपर्यंत प्लास्टर काढायचं नाही म्हणून."

ꙮꙮꙮ

काम न करणाऱ्या चपराशाला काढून टाकायचे ठरल्यावर त्याला निरोप देण्याचे काम नव्यानेच रुजू झालेल्या प्रा. गोडबोलेंवर सोपविण्यात आले. त्यांनी चपराशाला सांगितले, "हे बघ दोस्ता, तू या महाविद्यालयात इतका चांगला रमला आहेस की तुझ्याशिवाय आम्हाला आणि आमच्याशिवाय तुला जगणं जरा कठीणच जाणार आहे; पण पुढच्या महिन्यापासून आम्ही तसा प्रयत्न करून पाहणार आहोत."

ꙮꙮꙮ

"आयाराम, मी तुझ्यासारखी दाढी वाढवून पाहिली; पण आरशात बघितल्यावर मला माझंच रूप राक्षसी वाटायला



लागलं आणि मी ती काढून टाकली."
"गयाराम, मीपण तुझ्यासारखी सफाचट दाढी करून पाहिली; पण आरशात बघताच मला माझीच लाज वाटायला लागली आणि मी पुन्हा दाढी वाढवली.

ꙮꙮꙮ

महाविद्यालयाच्या आजीमाजी विद्यार्थ्यांचा मेळावा भरलेला असतो. तो आटोपताच नुकतीच पदवी घेतलेला लखनपाल सायकलरिक्षात बसून बसस्टँडकडे निघतो. रिक्षावाला विचारतो, "तुम्ही या महाविद्यालयाचे पदवीधर आहात?"
अभिमानाने छाती फुगवून लखनपाल म्हणतो, "मग? उज्ज्वल भविष्याची स्वप्ने घेऊन मी आताच या महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली आहे."
"आपल्याला भेटून आनंद झाला. मीही उज्ज्वल भविष्याची स्वप्ने घेऊन वीस वर्षांपूर्वी याच महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली होती. तेव्हापासून रिक्षा ओढतोय."

ꙮꙮꙮ

छापखान्यातून कागद चोरून नेल्याचे लक्षात आल्यावर चोरी करणाऱ्या नोकराला चिक्कूशेटने पकडले. "मला सोडा मालक. मी तुमच्या कागदाची भरपाई माझ्या पगारातून

करून देईन."

"गाढवा, कागदाच्या भरपाईएवढा तुला पगार तरी आहे का?"

"मग मालक, भरपाईपुरतातरी पगार वाढवून द्या."

ꪛꪛꪛ

गडबडे मॅडम प्रथमच परदेशवारीहून परतल्या. सोबतच्या शिक्षिकांनी विचारलं, "मॅडम, तुम्हाला तेथे इंग्रजी बोलायला अडचण गेली का?"

"छे छे! उलट मी इंग्रजी बोलायला लागले, की तिथलेच लोक अडचणीत पडत." गडबडे मॅडमनी अभिमानाने सांगितले.

ꪛꪛꪛ

संगणकांमध्ये फार मोठा बिघाड झाल्याने रेल्वेच्या रिझर्वेशनसाठी मोठाली रांग लागली होती. फार वेळ गेल्यानंतर गंगूबाईंचा नंबर लागला. "दे बाबा लवकर पुण्याचं रिझर्वेशन. त्रासून गेलाय जीव." धापा टाकत त्या बोलल्या.

"आजी तुम्ही कशाला एवढा त्रास घेतलात? सुनेला पाठवायचं होतं तुमच्या." रेल्वे क्लार्कने सल्ला दिला.

"मी रिझर्वेशनकरिता निघाले, तेव्हा मला सून नव्हती. तेव्हा माझ्या सासूने मला रिझर्वेशनला पाठवलं होतं, तो



आता माझी सून आल्यावर नंबर लागला." गंगूबाईंनीही टोला हाणला.

ꪛꪛꪛ

"ऑर्डर, ऑर्डर." न्यायाधीश महाराजांची ऑर्डर ऐकताच सर्वजण शांत झाले आणि पिंजऱ्यातील आरोपी उद्गारला, "कृपया एक प्लेट मिसळ आणा."

ꪛꪛꪛ

गवईबाईंनी शेजारणीला तासभर स्वतःच्या आवाजात गीत म्हणून दाखवले.

"काय कसा वाटला माझा आवाज?"

"गवईबाई तुम्ही रेडिओस्टारच असायला हव्या होतात."

"इतका छान आहे नं माझा आवाज?"

"तसं नव्हे. रेडिओ हवा तेव्हा बंद करता येतो ना!"

ꪛꪛꪛ

"तुमच्या जीवनात सर्वोत्तम अभिनय तुम्ही केव्हा केलाय?" मुलाखतीत जयफलितांना प्रश्न केल्या गेला.

"दोन वर्षांपूर्वी माझ्या घरी आयकर अधिकाऱ्यांची

धाड पडली, तेव्हा त्यांच्यापुढे केलेला अभिनय.”

“दगडू, दूध नासणार नाही, असा सोपा उपाय आहे का रे काही?”

“आहे ना काकू. दूध म्हशीकडेच राहू द्यायचे.”

“ऑर्डर, ऑर्डर. आता कोणीही आवाज केल्यास त्याला न्यायालयाबाहेर काढले जाईल.” न्यायाधीश महाराजांची ऑर्डर ऐकताच सर्वजण शांत झाले आणि पिंजऱ्यातील आरोपी उद्गारला, “मी आवाज केल्यास मलाही हीच शिक्षा मिळेल ना, न्यायाधीश महाराज?”

“धनत्रयोदशीस तुम्ही घराचे दरवाजे उघडे ठेवले, तर लक्ष्मी प्रवेश करते.” कंजुषीकरिता प्रसिद्ध असलेल्या त्या शेठजींनी नोकरास सांगितले.

“होय मालक. तुम्ही दरवाजे उघडल्याशिवाय लक्ष्मी तुमच्याकडून बाहेर पडणारच कशी?”



“आज मी विमा उतरवला. माझे काही बरेवाईट झाल्यास तुला पैसे मिळतील.”

पतीचे बोलणे ऐकून सुंदरी म्हणाली, “पैशांचाच विचार करायचा तर मग डॉक्टरकडेही कशाला जायचे? तेही पैसे वाचून मला मिळतील ना!”

बढती मिळाल्याने रामू आनंदात दुकानात गेला आणि नेकटाय खरेदी करू लागला. पण दुकानदाराने सांगितलेली तीनशे रुपये किंमत ऐकून तो म्हणाला, “अहो, या टायपेक्षातर चप्पलही कितीतरी स्वस्त येते.”

“मग गळ्यात चप्पलच अडकवून फिरा ना!” दुकानदार म्हणाला.

पतिनिधनानंतर काऊताई फोटोग्राफरकडे ह्यांचा लहान फोटो मोठा करून घेण्यासाठी गेल्या. “फक्त एक करा. ह्यांची टोपी चांगली दिसत नाही. ती फोटो मोठा करताना काढून टाका.”

“काऊताई, तुमच्या मिस्टरांना केस होते की टक्कल?” फोटोग्राफरने विचारले.

“इश्श! टोपी काढल्यावर तुम्हाला दिसेलच की.”

काऊताई उत्तरल्या.

ꩮꩮꩮ

तीर्थक्षेत्राला गेलेल्या शेठजींना नदीचा तीर पार करायचा होता. नावाड्यांनी पन्नास रुपये दर सांगताच तीर पार करावा की नाही ह्या विचारात शेटजी पडले. नावाडी म्हणाला, “शेठजी, हे क्षेत्र फार पवित्र आहे. सगळेच यात्रेकरू पैलतीरी जातात. वसिष्ठ, अंगद, अगस्ती, अत्री अशा अनेक ऋषींनी पाण्यावरून चालत जाऊन पैलतीर गाठला.”

“गाठला असेल बाबा, तुझा पन्नास रुपयांचा दर त्यांनाही परवडला नसावा.” शेठजींनी घाम पुसत म्हटले.

ꩮꩮꩮ

गजू : सूर्य आणि चंद्र हे पूर्वेलाच का उगवतात?
संजू : ह्या प्रश्नाचे उत्तर तर कोणी वेडाही देऊ शकेल.
गजू : म्हणूनच तर तुला विचारतोय ना!

ꩮꩮꩮ

दांड्यावर पोराला बसवून गंपूनाना सायकल दामटत होते. पोरगा मोठमोठ्याने रडत किंचाळत होता. ते पाहून लोक घाबरून बाजूला होत होते. एकाने विचारलं, “काय



हो, पोरगं एवढं ओरडतंय आणि तरी तुम्ही सायकल पळवताय?”

“बरंय की किंचाळतंय तर. सायकलला ब्रेकही नाही आणि घंटीही नाहीये.” गंपूनानांनी उत्तर दिलं.

ꩮꩮꩮ

छकुली शेजारच्या काकूंना सांगत असते. “आमच्या आईचं काही समजत नाही. मी रात्री जागी असते, तर मला थोपटून थोपटून झोपवते आणि सकाळी मी गाढ झोपली असते, तर गदागदा हलवून उठवते.”

ꩮꩮꩮ

डॉ. भटके नव्यानेच गावात आले आणि एका ग्रामस्थाला विचारू लागले, “काय दादा, या गावात डॉक्टरकीचा धंदा चालेल की नाही?”

“काही सांगता येणार नाही.” ग्रामस्थ म्हणाला.

“का?” डॉक्टर भटक्यांनी प्रश्न केला.

“एकतर येथील वातावरण फारच चांगले आहे आणि येथे कोणी आजारी पडत नाही. गेल्या पाच वर्षांत केवळ एकच व्यक्ती मरण पावला.”

“कोण होता तो? कशाने मेला?”

“डॉक्टर होता. उपासमारीने मेला.” ग्रामस्थाने

उत्तर दिले.

ᔑᔑᔑ

गंगाराम : घरी तसा माझा चांगला रुबाब आहे, संगाराम. रात्री दहा वाजताही मला गरमागरम पाणी मिळतं."

संगाराम : पण एवढ्या रात्री तुला गरम पाणी कशाला लागतं?

गंगाराम : अरे मग, एवढ्या थंडीत मी काय गार पाण्याने भांडी घासायची?"

ᔑᔑᔑ

म्युझियममध्ये फिरताना थकलेले अंतूशेठ एका सिंहासनावर बसले. लगेच तिथल्या कर्मचाऱ्याने हटकले, "अहो, त्यावर बसू नका. ते शाहू महाराजांचे सिंहासन आहे."

"बरे बरे, ते आले की उठतोच मी." अंतूशेठ बोलले.

ᔑᔑᔑ

अण्णासाहेब : बावीस वर्षे मी लेखन केल्यावर माझ्या लक्षात आले, की मला खरेतर साहित्यातले काहीच कळत नाही.



वार्ताहर : मग आपण लेखन थांबवले का?

अण्णासाहेब : छे छे, तोपर्यंत तर मी फार महान लेखक म्हणून मान्यता पावलो होतो.

ᔑᔑᔑ

अजाबरावांचे पत्नीशी भांडण झाले आणि पत्नीने त्यांना लाटणे फेकून मारले. लाटणे त्यांच्या पायावर लागले आणि हाड मोडले. हॉस्पिटलमध्ये पायाला प्लास्टर बांधून ते विश्रांती घेत होते. शेजारच्या खाटेवरील व्यक्तीचे दोन्ही पाय प्लास्टरमध्ये पाहून अजाबरावांनी हळूच विचारले, "काय हो, तुम्हाला दोन बायका आहेत का?"

ᔑᔑᔑ

लठ्ठ बळीरामपंत एका हातात एक पुस्तक तर दुसऱ्या हाती दुसरे पुस्तक घेऊन वाचत होते. मध्येच ते एका पुस्तकात बघायचे, नंतर दुसऱ्या पुस्तकात बघून मोठमोठ्याने हसायचे. हा प्रकार पाहून एका गृहस्थाने विचारले, "काय हो? हा काय प्रकार आहे. तुम्ही एकाच वेळी दोन पुस्तके वाचता आहात का? आणि मध्येच हसता आहात, ते का?"

"अहो, माझ्या या हातातले पुस्तक जोक्सचे आहे आणि या हातातले पुस्तक या जोक्सच्या पुस्तकाचे गाईड

आहे."

ꗀꗀꗀ

पावणे तीन तास संपले तरी चंदूने 'आळस' ह्या विषयावरचा निबंध लिहिला नाही. शेवटी तीनच शब्द लिहिले - 'ह्यालाच म्हणतात आळस.'

ꗀꗀꗀ

सदा : अरे भदा, काय किती वेळचा उन्हात उभा आहेस?
भदा : अरे सदा, मी घाम सुकवतो आहे.

ꗀꗀꗀ

सुंदर तरुणीसोबत तिचे वडीलही पाहून रॉकी त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, "हॅलो अंकल, हा पत्ता जरा सांगाल का? इतक्यातच कुठेतरी ते राहतात."

"मला काय पोस्टमन समजलात काय?" त्रासिक चेहरा करून मुलीचे वडील म्हणाले.

*छे छे, कोणी शेंबडा पोरही सांगेल, असे मला त्यांनी सांगितले होते, म्हणून तुम्हाला विचारले."

ꗀꗀꗀ

यात्राकंपनीसोबत आलेल्या मंडळींना पावनखिंड



दाखवताना गाईड म्हणाला, "येथेच लढता लढता बाजीप्रभू देशपांडे पडले होते." बोदुलेबाई लगेच ओरडल्या, "पडणारच. ही जागाच मेली किती निसरडी आहे. मीसुद्धा पडत होते की!"

ꗀꗀꗀ

कार्यालयात आपण बॉस असूनही कोणीच आपल्याला मान देत नाहीत, हे पाहून सदानंदाने केबीनबाहेर एक पाटी लावली - 'मी बॉस आहे.' दुसऱ्या दिवशी ताठ मानेने ऑफीसात आलेल्या सदानंदाने बघितलं, पाटीखाली कुणीतरी लिहिलं आहे - 'माझी पाटी परत करा, असा तुमच्या पत्नीचा निरोप आला आहे.'

ꗀꗀꗀ

सिन्हाजी 'कौन बनेगा....'च्या खुर्चीवर बसले होते. स्वागतानंतर त्यांना विचारण्यात आले, "तर सिन्हाजी, तुमच्या वडिलांचे नाव सांगाल काय?"

सिन्हाजी काही न बोलता कॉम्प्युटरकडेच बघत बसले. पुन्हा त्यांना विचारले गेले, "सिन्हाजी, तुम्हाला ऐकू आले नसावे, मी विचारले, तुमच्या वडिलांचे नाव सांगाल काय?"

"ऐकू आले हो, पण अजून तुम्ही चार ऑप्शन

दिलेच कुठे?"

ꨄꨄꨄ

डॉक्टर : बाई, तुम्हाला दवाखान्यात भरती करावे लागेल. काल तुमचे वजन पन्नास किलो होते, आज अठ्ठेचाळीस किलो झाले आहे."

बाई : काळजी करू नका डॉक्टर. मी आज मेकअप केलेला नाहीये."

ꨄꨄꨄ

खटुलेकाकांच्या भांडकुदळ पत्नी वारल्या. अंतिम संस्कार आटोपून सर्वजण परतत असताना वादळ सुटले आणि आकाशात वीज कडाडली. आपल्या सोबतच्या मित्राला खटुलेकाका हळूच म्हणाले, "वाटलं नव्हतं, इतक्या लवकर ती वर पोचेल म्हणून."

ꨄꨄꨄ

ठोकळ काका-काकूंचे ठोकळे मारून मारून भांडण सुरू होते. तोच कचरेवाला आला. 'कचरा' असा आवाज येताच ठोकळ काकू ओरडल्या, "काही नको, आधीच आमच्या घरी मोठा कचरा पडला आहे."

ꨄꨄꨄ



हॉटेलमध्ये एका माणसाने प्रा. विसरभोळेंना विचारले, "काय हो, राम जोशी आपणच का?"

"छे हो, मी प्रा. भोळे." 'विसर' शब्द विसरल्याने प्रा. विसरभोळ्यांनी उत्तर दिले. "पण मला का आपण विचारले?"

"कारण तुमच्या हाती असलेल्या छत्रीवर राम जोशी असे नाव लिहिले आहे, आणि मीच तो राम जोशी आहे."

ꨄꨄꨄ

इंद्रायणीसाठी अनेक मुलं पाहूनही एकही पसंत पडेना. तिला एखादा पसंत पडला तर तिच्या आईला पसंत पडेना. तिचे बाबा मात्र या मायलेकींच्या पसंती-नापसंतीने वैतागून गेले होते. शेवटी एक मुलगा दोघींच्याही पसंतीला उतरला. पण काहीतरी व्यंग काढायचे म्हणून इंद्रायणीची आई म्हणाली, "तसा मुलगा बरा आहे; पण पायात जरा आखूड वाटतो हो."

"आखूड? कोण म्हणतं असं? जमिनीवर चांगले पाय टेकत होते की त्याचे." इंद्रायणीच्या बाबांनी त्वरित उत्तर दिलं.

ꨄꨄꨄ

शंकरने परीक्षेच्या उत्तरपत्रिकेत शंभराची नोट ठेवली

आणि लिहिले, ‘कृपया शंभर गुण टाकावे. करिता शंभर रुपये ठेवत आहे.’ काही दिवसांनी निकाल आला आणि शंकर नापास झाला. ओळखी व लाच देऊन शंकरने उत्तरपत्रिका मिळवली. त्यात तपासणाऱ्याने ऐंशी रुपये ठेवले होते आणि लिहिले होते, ‘वीस गुण देत आहे. करिता ऐंशी रुपये परत.’

ღღღ

गोटोबांचे निधन झाले आणि ते चित्रगुप्तापुढे उभे झाले. चित्रगुप्ताने चोपडी पाहून त्यांच्या पापपुण्याचा हिशोब लावला आणि स्वर्ग किंवा नरक दोन्हींची मुभा दिली. आपण कोठे जावे, याचा विचार करीत गोटोबा स्वर्गापुढे गेले. तेथे सर्वत्र शुकशुकाट होता. नरकापुढे मात्र काही सेवक हारतुरे घेऊन येणाऱ्यांच्या स्वागताला उभे होते. गोटोबांनी आत डोकावले. आत प्रत्येकाला शिक्षा केल्या जात होत्या. यातना दिल्या जात होत्या. गोटोबांनी दारावरच्या सेवकांना विचारलं, “आत शिक्षा आणि दारावर तुम्हीतर जंगी स्वागत करताय, असे का?”

“आम्हाला नरकाचे मार्केटिंग करण्याची ड्युटी मिळाली आहे.” एक सेवक नम्रपणे म्हणाला.

ღღღ



इंदूताई काम करत असताना बाहेरून आवाज आला, “काही भंगार आहे का ताई?”

इंदूताईंना नीटसे ऐकू आले नाही. त्यांनी बाहेर न पाहताच उत्तर दिले, “हे आत्ताच बाहेर गेले आहेत.”

ღღღ

बाळकोबांचे निधन झाले आणि ते नरकात पोचले. चित्रगुप्ताने त्यांना कोणत्याही देशाच्या नरकात जाण्याची मुभा दिली. बाळकोबा अमेरिकेच्या नरकापुढे गेले. आत प्रवेश करणाऱ्यांना खिळ्यांच्या बेडवर झोपवून कर्मचारी फटके मारीत होता. त्यानंतर विजेच्या खुर्चीत बसवून शॉक देत होता. बाळकोबा पुढे जर्मनी, ब्रिटन, जपान अशा विविध देशांच्या दरवाजाशी गेले. तेथेही अशाच प्रकारच्या शिक्षा होत्या. मात्र कोणत्याही नरकाच्या द्वाराशी गर्दी नव्हती. भारतीय नरकाच्या दरवाजाबाहेर लांबच लांब रांग लागली होती. बाळकोबांनी आश्चर्याने चौकशी केली तेव्हा उत्तर मिळाले की, विजेची खुर्ची नादुरुस्त अवस्थेत पडली आहे, त्यामुळे तीवर बसूनही शॉक लागत नाही. खिळ्यांच्या बेडचे खिळे चोरी गेलेले आहेत आणि फटके मारणारा कर्मचारी सरकारी खात्यात काम करणारा असल्याने केवळ मस्टरवर सही करण्यापुरता येतो आणि पसार होतो.

बाळकोबांनी लगेच भारतीय नरकात अत्यानंदाने

प्रवेश केला.

ꗃꗃꗃ

बाजारात फारसे न जाणाऱ्या बंडोपंतांना पत्नीने भाजीपाला आणण्यास पाठविले. एका विक्रेत्यापुढे कसल्याशा बिया पाहून त्यांनी विचारले, “ह्या कसल्या बिया?”

“टरबुजाच्या.” विक्रेत्याने उत्तर दिले.

“याची उसळ करतात का?”

“नुसत्या खाल्यातरी बुद्धी तेज होते.” विक्रेत्याने फिरकी घेतली.

“अरे वा!” असे म्हणत बंडोपंतांनी चार बिया तोंडात टाकल्या. “ह्याचा भाव काय?”

“तीस रुपयांना चार बिया.”

“बापरे! तीस रुपयांनातर अख्खी दोन टरबुजं येतील.”

“बघितलंत साहेब, चारच बिया खाल्याबरोबर तुमची बुद्धी कसं काम करू लागली.”

ꗃꗃꗃ

विष्णोपंत : गेले काही दिवस माझी पत्नी फारच कटकट करत होती. हे दुखतंय, ते दुखतंय असं म्हणत लोळत राहायची. डॉक्टर झटकेंमुळे खणखणीत बरी झाली.



गंगाधरपंत : काय औषध दिलं त्यांनी?

विष्णोपंत : ते एवढंच म्हणाले, म्हातारपण आलं की असं चालायचंच. तेव्हापासून तिची सगळी दुखणीच पळाली.

ꗃꗃꗃ

छोटूराम आणि मोटूराम ट्रेकिंगसाठी गेले. रात्र होताच त्यांनी तंबू उभारला. खाणे करून झोपी गेले. रात्री केव्हातरी मोटूराम छोटूरामला उठवू लागला. छोटूराम उठताच मोटूरामने वर काय दिसतंय, म्हणून विचारलं. मोटूरामने उत्तर दिलं, “वर आकाश दिसतंय. त्यातील चांदण्या दिसताहेत. चंद्र दिसतोय. पण का रे?”

“आपला तंबू चोरीला गेलाय.” मोटूराम शांतपणे म्हणाला.

ꗃꗃꗃ

प्रा. टांगे यांच्याकडे संचलनाची आणि पाहुण्यांच्या परिचयाची जबाबदारी होती. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अध यक्षीणबाईंचा परिचय त्यांच्याच मुखाद्वारे ऐकून लिहून घेण्याचे काम प्रा. टांगे करीत होते.

प्रा. टांगे : मॅडम, आपले वय काय?

अध्यक्षीण बाई : वीस वर्षे आणि काही महिने.

प्रा. टांगे : फक्त? आणि काही महिने म्हणजे किती?

अध्यक्षीण बाई (लाजत) : दीडशे.

ՁՁՁ

नवरा : काय गं, एवढी तावातावाने कुठे निघालीस?
बायको : शेजारणीकडे.
नवरा : अगं, कालच तुमचं भांडण झालं ना?
बायको : हो. काल सेमी फायनल होती, आज फायनल आहे.

ՁՁՁ

नव्यानेच प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्राचार्य शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत होते. “जर कोणी एक तास बुडविला, तर त्याला दहा रुपये दंड, जर कोणी दोन तास बुडविले तर त्याला पंधरा रुपये दंड, जर कोणी. ...”

“सर, सीझन पाससाठी किती भरावे लागतील?” मागच्या बाकावरून एकाने विचारले.

ՁՁՁ

डॉ. झटकांच्या रुग्णालयातून बरा झालेला शाहरुख त्यांना म्हणाला, “साहेब, मला कमी बिल लावा. कधीकाळी मीही तुमच्या कामी येईन.”



“काय करतोस तू?” डॉ. झटकांनी विचारले.

“स्मशानाशेजारी माझी लाकडाची वखार आहे.” शाहरुखने उत्तर दिले.

ՁՁՁ

रामदिन घरी आला तेव्हा बायको रडत होती. त्याने विचारलं, “काय झालं रडायला?”

“तुमच्यासाठी मी मिठाई केली होती, ती शेजारच्या नव्या कुत्र्याने खाऊन टाकली.” रडतच बायको म्हणाली.

“एवढंच ना! आपणही उद्या नवा कुत्रा आणूया.”

ՁՁՁ

दोन शेजारी राष्ट्रांतील लढाई दीर्घकाळ सुरू होती. सैनिकांचा त्यांच्या घरच्यांशी, परिचितांशी पत्रव्यवहार सुरू असायचा. एक सैनिक आपल्या प्रेयसीला सतत पत्रे पाठवायचा. एका पत्रात त्याने लिहिले, ‘आज आम्हाला शत्रूच्या हल्ल्यामुळे नाइलाजाने दोन किलोमीटर माघार घ्यावी लागली.’

तीन दिवसांनी त्याने दुसरे पत्र लिहिले, ‘आज पुन्हा आम्हाला शत्रूच्या हल्ल्यापुढे तीन किलोमीटर मागे सरकावे लागले. पण हरकत नाही. असेच सुरू राहिले तर येत्या काही आठवड्यातच आपल्याला एकमेकांना प्रत्यक्ष

भेटता येईल.

99 ०९ ०९

एक वेडा आपल्या भावाला पत्र लिहीत होता. दुसरा वेडा त्याला म्हणाला, “अरे तुला लिहिता तरी येतं का?”

“मग माझ्या भावाला वाचता तरी येतं का?” पहिल्या वेड्याने खुलासा केला.

०९ ०९ ०९

दिनूने लवकरच ऑफीसमधले काम आटोपले आणि घरी फोन लावला. नोकराने फोन उचलला.

“हे बघ, बाईसाहेबांना म्हणावं, तयार रहा. मी लवकरच येतोय.” दिनूने ऑर्डर सोडली.

“बरं साहेब, पण आपलं नाव काय म्हणालात?” नोकराने विचारलं.

०९ ०९ ०९

प्रा. पाल्हाळेंचे भाषण लांबलचक झाले. ऐकणारे श्रोते हळूहळू निघून गेले. फक्त एक श्रोता शेवटपर्यंत थांबला. एकदाचं पाल्हाळेंचं भाषण संपलं आणि तो श्रोता स्टेजवर आला.



“तुम्ही खरंच दर्दी श्रोते दिसता.” पाल्हाळे म्हणाले.

“छे, आता माझं भाषण आहे आणि इतर श्रोते न राहिल्याने ते संपेपर्यंत तुम्हाला ऐकायचं आहे.” त्याने खुलासा केला.

०९ ०९ ०९

श्याम आणि श्यामल यांच्यात सतत भांडणे होत. त्यांचे स्नेही राम आणि राधा यांनी त्यांना सल्ला दिला की दोघांनीही एकमेकांच्या नातेवाइकांचा आदर करायचा, त्यांच्याशी चांगले वागायचे. आठच दिवसात श्याम-श्यामलची भांडणे आणखी वाढली. राम-राधेने त्यांना विचारले, “तुम्ही आमचा सल्ला उपयोगात आणला नाही का?” त्यावर श्यामने उत्तर दिले, “आणला की. हिची नणंद आली तेव्हा मी तिला व तिच्या मुलांना कपडे घेऊन दिले.”

“ह्यांचे सासूसासरे आले, तेव्हा मी त्यांना गोडधोड करून खाऊ घातले आणि चार दिवस मुक्कामी ठेवून घेतले.”

०९ ०९ ०९

धर्माचा प्रसार करीत एक मिशनरी पाश्चिमात्य देशाच्या एका आदिवासी प्रदेशाच्या जंगलात पोचला. तिथल्या प्रमुखाला भेटून त्याने आपल्या धर्माची माहिती दिली आणि विचारले, “यापूर्वी कोणी धर्मप्रचारक आले होते का?”

“हो तर! त्यांनीही तुमच्यासारखेच विचार मांडले होते. धर्मगुरूंबद्दलही माहिती दिली होती.” प्रमुखाने सांगितले.

“मग कसे वाटले आमचे धर्मगुरू?” मिशनरीने विचारले.

“फारच चविष्ट! अगदी लुसलुशीत वाटले चघळताना!” जिभल्या चाटत प्रमुखाने उत्तर दिले.

ꕥꕥꕥ

खोट्या सह्या करण्याबद्दल एका व्यक्तीवर खटला भरण्यात आला. साक्षीदाराची उलटतपासणी करताना वकिलाने विचारले, “आरोपी जेव्हा एकांतात असायचा, तेव्हा त्याला वेगवेगळ्या सह्या करत बसायची सवय होती का?”

“काही सांगता येणार नाही; कारण तो एकांतात असताना मी तिथे कसा असणार?” साक्षीदाराने उलट प्रश्न केला.

ꕥꕥꕥ

प्रेमप्रकरणांतून आत्महत्यांच्या बातम्यांना ऊत आला होता. बोंबलेकाकूंनी चिंटूला दम दिला, “हे बघ चिंट्या, तू जर काही प्रेम प्रकरण केले आणि आत्महत्या केलीस तर मी तुला पुन्हा घरात पाऊल टाकू द्यायची नाही, कळलं?”

ꕥꕥꕥ



बजापराव पहेलवान नदीवर आंघोळीकरिता गेले. काठावर कपडे काढून एक चिठ्ठी त्यावर लिहून ठेवली, ‘मी या प्रदेशातला एक नंबरचा कुस्तीपटू आहे. कोणी माझे कपडे चोरण्याचा प्रयत्न करू नये.’

आंघोळ करून आलेल्या बजापरावांच्या लक्षात आले की आपले कपडे कोणीतरी चोरून नेले आहेत आणि चिठ्ठी लिहून ठेवली आहे, ‘मी या प्रदेशातला एक नंबरचा धावपटू आहे. कोणी मला पकडण्याचा प्रयत्न करू नये.’

ꕥꕥꕥ

पत्नी : तुम्हाला कितीही महत्त्वाच्या, सस्पेन्स, सिक्रेट न्यूज सांगितल्या तरी तुम्ही या कानाने ऐकता आणि त्या कानाने सोडून देता.

पती : आणि तू सिक्रेट गोष्टी दोन्ही कानांनी ऐकते आणि तोंडाने सोडून देते.

ꕥꕥꕥ

सेल्समन : (दरवाजाबाहेरून) काय हो, हा तुमचा कुत्रा चावत तर नाही ना?”

घरमालक : (आतून) आत या ना, मलाही तेच बघायचंय; कारण हा कुत्रा आजच आणलाय.”

ꕥꕥꕥ

प्रियकर : एखादी सुंदर मुलगी दिसली, तर मी तिच्याकडे बघतच बसतो, असा तुझा आरोप आहे. पण असं सौंदर्य दिसलं तर तू काय करतेस?
प्रेयसी : मीही पुष्कळ वेळ पाहते आणि मग आरसा ठेवून देते.

ඩිඩිඩි

पती : प्रिये, मला वचन दे की मी परदेश दौऱ्यावर गेल्यावर माझ्यामागे तू कोण्याही पुरुषाला घरात येऊ देणार नाहीस, केवळ स्त्रियांनाच येऊ देशील.
पत्नी : दिलं वचन, आता तुम्हीही तसंच वचन द्या.
पती : मीसुद्धा तुझ्या वचनाप्रमाणे कोण्याही पुरुषाला येऊ देणार नाही, केवळ स्त्रियांनाच येऊ देईन.

ඩිඩිඩි

रामरावांचे ऑपरेशन झाले. थोडीशी भूल (ॲनास्थेशिया) उतरल्यावर त्यांनी पत्नीकडे पाहिले आणि म्हणाले, "तू फार सुंदर दिसतेस." आणि पुन्हा त्यांना ग्लानी आली. जरा वेळाने पुन्हा भूल उतरली. त्यांनी पत्नीकडे पाहत म्हटले, "तू बरी दिसतेस."

पत्नीला 'सुंदर'पेक्षा 'बरी' हे शब्द आवडले नाहीत. तिने त्याबद्दल रामरावांना हटकले तेव्हा ते म्हणाले, "अग,



आत्ता कुठे माझी भूल उतरते आहे."

ඩිඩිඩි

कोंडोबाच्या घरापुढील गर्दी पाहून बंडोबांनी विचारले, "काय झालं कोंडोबांना?"

"कोंडोबांना काही नाही झालं. त्यांच्याघरी दीर्घकाळासाठी रहायला आलेले पाहुणे पळून गेले." लोकांनी उत्तर दिले.

"मग गर्दी कशाची?" बंडोबांनी विचारले.

"ते पळून जावे म्हणून कोंडोबांनी पाहुण्यांना सोट्याने बडविले." लोकांनी उत्तर दिले.

"मग कोंडोबांना पोलिसात द्यायचे आहे का?"

"छे छे, त्यांच्याकडून तो सोटा मिळविण्यासाठी ही गर्दी जमली आहे. लोकांनी उत्तर दिले.

ඩිඩිඩි

गुरुजी : श्यामू, तुझ्याबरोबर शाळेत आले, ते सभ्य गृहस्थ कोण?
श्यामू : (खो खो हसत) सभ्य गृहस्थ? छे छे! तेतर आमचे बाबा.

ඩිඩිඩි

दीर्घोपचारानंतरही गजाननपंतांच्या तब्येतीत सुधार होत नव्हता. इतके दिवस रुग्णालयात राहून ते कंटाळून गेले होते. एक दिवस डॉक्टरांनी त्यांना तपासून सांगितले, "सांगताना वाईट वाटतंय, पण माझ्या उपचारांचा उपयोग होत नाहीये. तुम्ही आता काहीच दिवसांचे सोबती आहात. कुणाला भेटायचंय का तुम्हाला?"

"हो, दुसऱ्या एखाद्या चांगल्या डॉक्टरला बोलवा." गजाननपंत क्षीण आवाजात उत्तरले.

ぴぴぴ

एस.पी.साहेबांचा नवा पामेरियन कुत्रा हरवला. सगळा स्टाफ कुत्र्याचा शोध घेत होता. ज्याला तो कुत्रा सापडेल तो भाग्यशालीच ठरणार होता. अन्यथा शिव्यांच्या लाखोल्यांशिवाय काहीच मिळणार नव्हते. शेवटी दोन पी. एस.आय. एक बोकड पकडून घेऊन आले. एस.पी. साहेबांनी विचारलं, "अरे कुत्रा आणायला गेले होते आणि हे काय आणलं मुर्खांनो?"

"साहेब, चांगला थर्ड डिग्रीचा वापर केला, तेव्हा हा कबूल झाला की मीच तो कुत्रा म्हणून." एका पी.एस. आय.ने उत्तर दिलं.

ぴぴぴ



पिंकी : अहो, मी जगातून गेली तर तुम्ही काय कराल?
पती : मी वेडा होईन गं.
पिंकी : दुसरं लग्न तर नाही ना करणार?
पती : छे छे, इतका वेडा नाही होणार.

ぴぴぴ

सराईत गुंड सलीम महिलांच्या छेडखानीकरिता प्रसिद्ध होता. एका रेल्वेस्टेशनच्या वेटिंगरूममध्ये एका महिलेच्या छेडखानीनंतर पकडल्या गेलेल्या सलीमची न्यायालयात उलटतपासणी सुरू होती.

वकील : एकदा बाईंना त्रास देऊन तू निघून प्लॅटफॉर्मवर निघून गेलास आणि परत थोड्या वेळाने येऊन आणखी त्रास देऊन निघून गेलास, असे का?"

आरोपी सलीम : पहिल्यांदा गेलो तो गाडी पकडायला; पण गाडी लेट होती, म्हणून परत येऊन थोडावेळ छेडखानी करून गेलो. तोपर्यंत गाडी आली होती.

ぴぴぴ

हवालदार आपल्या बायकोची तक्रार ठाणेदारसाहेबांकडे करत होता. "असं वाटतं सााहेब, तिला तिसऱ्या मजल्यावरून खाली फेकून द्यावं. पण हिंमत होत नाही."

"का?" ठाणेदारसाहेबांनी विचारलं.

"बिल्डिंगला चौथा मजला नाही. तिसऱ्या मजल्यावरून फेकल्यावर ती जर बचावली, तर माझं काय होईल?"

ǒǒǒ

गुटगुटीत बाळांसाठी टॉनिकची जाहिरात वाचून बंडोपंत औषधी दुकानात गेले आणि त्यांनी ती बाटली विकत घेत विचारलं, "काय हो, खरंच बाळं गुटगुटीत होतील ना या टॉनिकमुळे?"

"अर्थातच. नाही झाले तर पैसे परत." दुकानदाराने सांगितले.

"पण हे टॉनिक मी घ्यायचं की माझ्या पत्नीने?" निघता निघता बंडोपंतांनी शंका विचारली.

ǒǒǒ

सैन्यभरती सुरू होती. बोल्होबाही रांगेत उभे होते. अधिकारी प्रश्न विचारीत होते. "समजा तुमचा एक कान छाटला तर?"

"मला नीट ऐकू येणार नाही." बोल्होबांनी उत्तर दिले.

"दोन्ही कान छाटले तर?" अधिकाऱ्याने विचारले.

"मला नीट दिसणार नाही." बोल्होबांनी उत्तर दिले.



"अरे, कान छाटल्यावर नीट न दिसण्याचा काय संबंध?"

"दोन्ही कान छाटल्यावर माझी टोपी डोळ्यांवर घसरणार नाही का?" बोल्होबांनी स्पष्टीकरण दिले.

ǒǒǒ

भूकंपाचे बरेच हादरे बसले आणि चंदूने वेधशाळेत फोन लावला. "काय हो, आत्ताच झालेल्या भूकंपाची तीव्रता सांगू शकाल का मला?"

"जरा थांबावं लागेल तुम्हाला. भूकंपाच्या धक्क्याने मी जो खुर्चीतून पडलोय, तो अजून उठू शकलेलो नाही." पलीकडून आवाज आला.

ǒǒǒ

गुरुजी : तुमच्या काळूची इतिहासातील प्रगती शून्य आहे.

धोंडिपंत : असणारच. मीही शाळेत असताना इतिहासात असाच कच्चा होतो.

गुरुजी : अच्छा, म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती झाली म्हणायची.

ǒǒǒ

नवरा : अग ए, या उन्हाळ्यात आपण विश्वभ्रमंती करूया.
बायको : नको हो, इथे राहून नवं काही करायचं म्हणजे आणखी कामाचा व्याप. त्यापेक्षा दुसरीकडे बाहेर टूरवर जाऊया.

ゐゐゐ

रात्री पिऊन आलेल्या बाबासोने घराची कडी वाजवली.
"कोण आहे?" बबिताने जाणून चिडून विचारले.
"मी मुंगी." बाबासोने युक्तीचा प्रयोग केला.
"मग दाराखालच्या फटीतून या की." बबिताने म्हटले.

ゐゐゐ

गप्पीदास वकील झाला आणि आपल्या पहिल्यावहिल्या गिऱ्हाइकाची वाट बघत ऑफीसमध्ये बसला होता. कुणीतरी आल्याची चाहूल लागली आणि त्याच्यावर प्रभाव पाडण्यासाठी तसेच आपण कामात किती व्यस्त आहोत, हे दाखविण्यासाठी त्याने कानाला फोन लावला आणि बराच वेळ 'नाही, जमणार नाही. मी फार व्यस्त आहे. पुढचा महिनाभर तरी तारखा नाहीत. बऱ्याच केसेस आहेत' अशी बडबड करीत राहिला. समोरची व्यक्ती शांतपणे समोर उभी राहिली. आपले पुरेसे इंप्रेशन पडले आहे, अशा विचारात गप्पीदासने त्या व्यक्तीला विचारले, "बोला, काय अडचण आहे? काही



केस असेल तर ...."
त्याला थांबवत ती व्यक्ती म्हणाली, "छे छे, केस वगैरे काही नाही. तुमचा नादुरुस्त फोन दुरुस्त करण्यासाठी टेलिफोन विभागातून आलो आहे."

ゐゐゐ

पत्नी रागावलेली होती. पती मनधरणी करीत होता; पण त्याच्या प्रत्येक वाक्यावर ती काहीतरी विरोधात्मक मुद्दा मांडत होती. शेवटी पतीने त्याला पत्नीकडून नव्यानेच भेट आलेल्या दोन शर्टपैकी एक घातला. "अच्छा, म्हणजे दुसरा आवडला नाहीच म्हणायचा तुम्हाला." तिने प्रतिक्रिया दिली.

ゐゐゐ

बंटी : बाबा, तुम्हालाही तुमचे बाबा मारायचे का हो?
बाबा : हो, खूप मारायचे.
बंटी : आणि तुमच्या बाबांना त्यांचे बाबा?
बाबा : हो, त्यांनाही त्यांचे बाबा मारायचे. पण का विचारतोस रे?
बंटी : नाही, म्हणजे आपल्या घराण्यात गुंडशाही आध ीपासूनच आहे म्हणायची.

ゐゐゐ

इस्त्री करताना आपण केलेला प्रताप ती त्याला सांगत होती.

ती : अहो, माझ्या हातून चुकीने तुमचा हिरवा शर्ट जळाला.
तो : हरकत नाही, माझ्याकडे दुसरा हिरवा शर्ट आहे.
ती : मला माहिती होतं. म्हणूनच मी दुसऱ्या हिरव्या शर्टचा तुकडा कापून जळालेल्या शर्टला ठिगळ जोडलं.

ஃஃஃ

पार्टी रंगात आली होती. अचानक रंगराव एका बाईमागे धावू लागले. यजमानांनी वेटरला बोलावून सांगितले, "आता रंगरावला जराही दारू देऊ नकोस. मूर्ख नशेत स्वतःच्याच बायकोच्या मागे धावतोय."

ஃஃஃ

डल्लूरामने अनेक मुली पसंत केल्या, त्याच्या वडिलांनाही त्या पसंत पडल्या; पण त्याच्या आईने त्या सर्व नापसंत केल्या. शेवटी त्याच्या मित्राने युक्ती सांगितली की अशी मुलगी पहायची की जी त्याच्या आईसारखी असेल. डल्लूरामला तशी मुलगी सापडली आणि त्याने आपली पसंती आईपुढे ठेवली. आईलाही ती पसंत पडली; पण ही मुलगी त्याच्या वडिलांनीमात्र विनाविलंब नाकारली.

ஃஃஃ



मुंबई पोलिसांनी कल्लूला खिसा कापताना पकडलं. "इथेच थांब, जाऊ नकोस. मी आत्ता हातकड्या घेऊन येतो."

"थांबा थांबा साहेब, मीच येतो तुमच्याबरोबर. तुम्ही परत आलाच नाहीत, किंवा गर्दीमुळे नेमकी चुकामूक झाली तर माझी काही दिवसांची फुकटची भाकरी जाईल."

ஃஃஃ

शेठजी शेवटचे श्वास मोजत होते. त्यांनी आपल्या एकुलत्या एका पप्पूला जवळ बोलवले. "हे बघ पप्पू, चांगला धंदा करायचा असेल, तर दोन गोष्टींचे पालन करणे गरजेचे आहे."

"कोणत्या गोष्टी पप्पा?" पप्पूने विचारले.

"एक म्हणजे दिलेला शब्द नेहमी पाळायचा आणि दुसरी गोष्ट म्हणजे कधी कुणाला शब्दच द्यायचा नाही."

ஃஃஃ

चिक्कू मारवाडी रागातच संपादकांकडे पोचले, "हे बघा संपादकमहोदय, तुम्ही आमच्या चिक्कूपणावरचे जोक्स छापणं बंद करा, नाहीतर उद्यापासून मी तुमचा पेपर शेजाऱ्यांकडून आणून वाचणं बंद करून टाकेन."

ஃஃஃ

मुलाखतीदरम्यान साहेबांनी पक्याला सांगितलं, “हे बघा, आम्ही तुम्हाला सुरुवातीला दोन हजार रुपये पगार देऊ. सहा महिन्यांनी तुमचा पगार पाच हजार केला जाईल. आता तुम्ही कधीपासून जॉईन होणार?”

“सहा महिन्यांनीच जॉईन व्हावे, असं ठरवतोय.” पक्याने उत्तर दिले.

ՋՋՋ

पुण्याच्या वैचित्र्यपूर्ण रहदारीत कोंडोबांच्या जीपला पीएमटीने धडक दिली आणि कोंडोबा बाहेर फेकले गेले. शुद्धीवर आले, तेव्हा काही रिकामी माणसे त्यांच्या भोवती रिंगण करून उभी होती.

“मी कुठे आहे?” पहिला नैसर्गिक प्रश्न कोंडोबांनी विचारला. गर्दीतून एक पोऱ्या आला आणि एक पुस्तक कोंडोबांपुढे धरत म्हणाला, “हा घ्या पुणे गाईड. यात पुण्यातील सर्व ठिकाणे आणि रस्त्यांचा नकाशाही दाखविला आहे. नवीन एडिशन फक्त वीस रुपये.”

ՋՋՋ

अंतूशेट आपल्याच रुबाबात ट्रेनमध्ये चढले. तिकिट काढायचं राहून गेलं. ट्रेन सुरू झाली. तिकीट चेकर येईपर्यंत त्यांना तिकिटाची आठवणच नव्हती; पण नंतर परिस्थिती



पाहून त्यांनी आपला प्रभाव चेकरवर पाडण्याचा प्रयत्न केला.

“काय महाशय, ओळखलं नाहीत वाटतं मला! मला दूरदूरपर्यंतचे लोक ओळखतात. तुम्हाला माझा चेहराही ओळखीचा वाटत नाही का?” आपण कोणीतरी मोठे व्यक्ती आहोत, असे वाटून चेकर सोडून देईल ही आशा अंतूशेटने बाळगली.

“तसा चेहरा ओळखीचा वाटतो; पण तुम्ही तर नेहमी थर्डक्लासचे तिकीट काढून बसायचे. आज इकडे फर्स्टक्लासकडे कुठे?” असे म्हणत चेकरने पावतीपुस्तक उघडले.

ՋՋՋ

ठमाकाकू फेकत होत्या, “ती बबली, लग्नानंतर ‘एक आवारा’ चित्रपटास गेली आणि तिला एक मुलगा झाला”

“हो?” नव्यानेच लग्न झालेल्या राधेने चकित होत म्हटले.

“ती शामी, लग्नानंतर ‘तीन देवियाँ’ चित्रपटास गेली आणि तिला तीन मुली झाल्या.”

“अरे देवा!”

“आणि ती जनी, लग्नानंतर ‘एक फूल दो माली’

चित्रपटास गेली आणि तिला दोन मुले झाली.”

“देवा रे देवा, आता कसं? मी कालच ‘अलिबाबा चालीस चोर’ पाहिला.” घाबरून राधेने म्हटले.

ꖋꖋꖋ

धोंडोपंत प्रवचन तन्मयतेने ऐकत होते. प्रवचनकार महाराज सांगत होते, “चोरी, लबाडी कधी करू नये.”

महाराजांचे हे बोलणे ऐकताच धोंडोपंतांचा चेहरा उतरला.

महाराजांनी पुढे सांगितले, “वेश्यागमन करू नये.” हे ऐकताच धोंडोपंतांचा चेहरा आनंदाने खुलला. महाराजांनी धोंडोपंतांच्या चेहऱ्यावरचे बदललेले भाव पाहिले. प्रवचनानंतर त्यांना जवळ बोलावून त्यासंदर्भात विचारले. धोंडोपंत म्हणाले, “महाराज, जेव्हा तुम्ही चोरी न करण्याबद्दल सांगितले तेव्हा मला माझ्या हरवलेल्या बटव्याची आठवण झाली आणि दुःख झाले. जेव्हा तुम्ही वेश्यागमन न करण्याबद्दल सांगितले, तेव्हा मी बटवा कुठे विसरलो, याची आठवण झाली आणि तो परत मिळेलच, याचा आनंद झाला.”

ꖋꖋꖋ

सीमा : काय गं शकू, तुझे तुझ्या नवऱ्याशी रोज का एवढे वाद होतात?



शकू : काय करू सीमा, माझी आणि ह्यांची ओळख एका वादविवाद स्पर्धेतच झाली होती.

ꖋꖋꖋ

“डॉक्टरसाहेब, माझी बायको बहिरी होत चालली आहे हो?” दामूअण्णांनी केविलवाणे होत म्हटले.

“त्या किती प्रमाणात बहिऱ्या झाल्या आहेत?” डॉक्टरांनी विचारले.

“ते मी कसं सांगू?”

“असं करा, त्यांच्यापासून १५ फुटांवर उभे राहून बोला. जर ऐकू गेले नाही तर १० फुटांवरून बोला. तरीही ऐकू गेले नाही, तर ५ फुटांवरून बोला. आणि मग मला त्यांच्या बहिरेपणाची तीव्रता सांगायला या.”

दामूअण्णा बायकोपासून १५ फुटांवर उभे राहून म्हणाले, “काय गं, आज कोणती भाजी केली आहे?”

उत्तर न मिळाल्याने ते तिच्यापासून १० फुटांवर उभे राहून म्हणाले, “काय गं, आज कोणती भाजी केली आहे?”

तरीही उत्तर न मिळाल्याने ते तिच्यापासून ५ फुटांवर उभे राहिले आणि तोच प्रश्न विचारला. त्या क्षणाला बायकोने फणकाऱ्याने त्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाली, “ऐकू येत नाही का बहिरे झालात? मघापासून तीनदा

सांगितलं, मटकीची उसळ केली आहे म्हणून."

ꩲꩲꩲ

आंबेवाले मिठाईवाले यांच्या दुकानात चितळे शिरले. "काय हो, तुमच्या दुकानात आंबे आहेत का?"

"नाही, हे मिठाईचे दुकान आहे." आंबेवाले उत्तरले.

दुसऱ्या दिवशी परत चितळे त्या दुकानात शिरले आणि प्रश्न केला, "काय हो, तुमच्या दुकानात आंबे आहेत का?"

"नाही, हे मिठाईचे दुकान आहे." आंबेवाले पुन्हा उत्तरले.

तिसऱ्या दिवशी चितळेंनी पुन्हा तोच प्रश्न विचारल्यावर आंबेवाले चिडले, "समजत नाही का एकदा सांगितलं तर? कानाखाली फटाका वाजवू का?"

"मग तुमच्या दुकानात फटाके आहेत का?" चितळेंनी प्रश्न केला.

"नाही."

"मग आंबे आहेत का?" चितळेंनी पुन्हा प्रश्न केला.

ꩲꩲꩲ

स्वर्ग आणि नरकातील मंडळींची संयुक्त मिटिंग



सुरू होती. स्वर्गातील व्यवस्थापकाने नरकातील व्यवस्थापकाला सांगितले,

"आमच्या भागात काही मंडळी आजारी पडली आहेत. दीर्घकाळापासून एकही डॉक्टर स्वर्गाची पायरी चढलेला नाही. जरा तुमच्या भागातील डॉक्टरची टेम्परारी ड्युटी इकडे लावा बरं."

"मुळीच नाही. तुमचे तुम्ही पहा." नरकाच्या व्यवस्थापकाने सांगितलं.

"हे बघा, नाहीतर मला खटला भरावा लागेल." स्वर्गाच्या व्यवस्थापकाने धमकी दिली.

नरकाचा व्यवस्थापक फिदीफिदी हसला. "खटल्यासाठी वकील कुठून आणाल? सगळे वकील तर आमच्या नरकातच आहेत."

ꩲꩲꩲ

बायको : अहो, रात्री तुम्ही खूपच पिऊन आलात. इतकं पिणं चांगलं नाही. काल तुमचे मित्र तुम्हाला घरी पोचवायला आले.

नवरा : हो ना, मलाही कळतं गं, पण माझे नालायक मित्र आणि त्यांची संगत....

बायको : पण ते तसे वाटले नाहीत पिऊन वगैरे.

नवरा : तेच तर, माझ्याजवळ अख्खी बाटली होती; पण

त्या दुष्टांनी हातही लावला नाही.

ᔓᔓᔓ

शंभूनाना फोनवर खाजगी एअरलाईन्सवाल्यांना विचारत होते, “काय हो, पुण्याहून मुंबईला विमानाने जायला किती वेळ लागतो?”

“जस्ट अ सेकंद...” पलीकडून बाईचा आवाज आला.

“थँक्यू व्हेरी मच!” असे म्हणत शंभूनानांनी फोन ठेवला.

ᔓᔓᔓ

प्रा. ढवळे आणि प्रा. कावळे रस्त्याने जात असता वरून कावळ्याने घाण टाकली ती ढवळेंच्या शर्टवर. कावळे हसू लागले.

“कसे हो कावळे सर तुम्ही. नेहमी सकारात्मक विचार करावा माणसानं.” ढवळे म्हणाले.

“आता या प्रसंगावर तुम्ही कोणता सकारात्मक विचार केला?” कावळेंनी विचारले.

“हाच की गाई, म्हशी, बैलांना उडता येत नाही, हे किती चांगलं आहे.” ढवळेंनी उत्तर दिले.

ᔓᔓᔓ



भागाबुढी मेडिकल शॉपमध्ये गेली आणि म्हणाली, “अरे बाबा माझ्या नातीसाठी व्हिटॅमिनच्या गोळ्या दे बरं.”

“कुठल्या व्हिटॅमिनच्या देऊ? ए, बी, सी, डी?” दुकानदाराने विचारले.

“कुठल्याही दे बाबा, माझ्या नातीला अजून ए, बी, सी, डी येत नाही.” भागाबुढीने उत्तर दिले.

ᔓᔓᔓ

भाषण आटोपल्यावर वक्त्याने विचारले, “आता कुणाला काही प्रश्न विचारायचे आहेत का?”

श्रोत्यांमधील शेखचिल्ली महोदय म्हणाले, “सांगा बरं, गाढवाला दोन पाय असतात की चार?”

क्षणाचाही विलंब न करता वक्ता म्हणाला, “मी तुम्हाला येथून नीट पाहू शकत नाही. आपण जरा पुढे आलात तर याचे उत्तर देता येईल.”

ᔓᔓᔓ

नेहमीप्रमाणे दारूच्या नशेत मस्तराम दवाखान्यात आला. त्याची अवस्था पाहून डॉक्टर झटका त्वरित म्हणाले, “मस्तराम, दारूच्या नशेत मी तुम्हाला तपासू शकत नाही.”

“ठीक आहे डॉक्टर, मी तुमची नशा उतरल्यावर

येतो.” मस्तराम म्हणाला.

ꔰꔰꔰ

डॉक्टर मटका : हे बघ फंटूश, तू सिग्रेट सोडणं फार गरजेचं आहे. नाहीतर तुझी प्रकृती आणखी बिघडेल.

फंटूश : मल कळतंय, डॉक्टर; पण मी नाही सोडू शकत.

डॉक्टर मटका : का? का नाही सोडू शकत?

फंटूश : मागे मी जेव्हा सिग्रेट सोडली, तेव्हा गुजराथमध्ये भूकंप आला. पुन्हा सोडण्याचा प्रयत्न केला तर दक्षिण भारतात सुनामी धडकल्या. आता कालपरवा सोडायचा प्रयत्न केला, तर खानदेशात बर्डफ्लूचा रोग आला. अशा येणाऱ्या संकटांमुळे मी सिग्रेट सोडू शकत नाही.

ꔰꔰꔰ

भिकारीण : काही वाढा हो ऐश्वर्याताई!

गौरी : हे बघ बाई, माझे नाव ऐश्वर्या नाही म्हणून तुला मागेच सांगितले होते ना? आणि माझ्याकडे काही अन्न शिल्लक नाही तुझ्यासाठी.

भिकारीण : तसं नाही ताई. तुम्ही अगदी ऐश्वर्या रायसारख्या दिसता ना, म्हणून हाक मारली.

गौरी : (आनंदाने) हो का? थांब हं जरा, मी आणतेच तुझ्यासाठी थोडं अन्न.

ꔰꔰꔰ



बरेच दिवस बंडूनानांकडे मुक्काम करून गुंडूनाना गावी जायला निघाले. छोट्या चुंचूला त्यांनी म्हटले, “चलतोस का मला सोडायला स्टेशनवर?”

“नको नको, तुम्ही बाहेर पडताच बाबा आम्हाला भरपूर भेळ, वडापाव आणि मिल्कशेकची पार्टी देणार आहेत.” चुंचूने उत्तर दिले.

ꔰꔰꔰ

झोप येत नाही, ही तक्रार घेऊन प्रा. काकडे डॉ. सुखासीन भोयर यांच्याकडे पोचले. औषधे घेतल्यावर काकडेंनी डॉक्टरांना विचारले, “काय हो डॉक्टर, तुम्हाला कधी असा त्रास होतो का हो?”

“हो, होतो ना कधी कधी.” डॉक्टरांनी सांगितले.

“मग तुम्ही काय करता?” काकडेंनी कुतूहलाने विचारले.

“काही नाही, एक पेग घेतो.”

“मग झोप लागते का छान?” काकडेंचा प्रश्न.

“नाही, पण झोप न येण्याचं दुःख होत नाही.” डॉक्टर सुखासीन भोयर म्हणाले.

ꔰꔰꔰ

जांबुवंतराव जोशिलाला सांगत होते, “काल तर अे.

सी. मुळे खोली इतकी थंड झाली होती, की माझी डबीत काढून ठेवलेली दातांची कवळीही कडकड वाजत होती."

"तरीच मी विचार करत होते, सकाळी तुम्ही उठले, तेव्हा तुमच्या अंगावरील कपडे बर्फाच्या चुऱ्याने झाकलेले का आहेत म्हणून?" जोशिलाने पुस्ती जोडली.

००००

पालेसिंग नव्यानेच चपराशी म्हणून रुजू झाला. साहेबांनी दरडावले, "पालेसिंग, आम्हाला सगळं ऑफीस स्वच्छ लागतं. कुठेही कचरा चालत नाही. अगदी पायऱ्यांवर असलेले मॅटही स्वच्छ हवे. तू आज ते स्वच्छ केले आहे ना?"

"होय साहेब." पालेसिंग उद्‌गारला.

"आणि आम्हाला खोटे बोलणारे चपराशीही चालत नाहीत. आपल्या पायऱ्यांवर मॅट आहेच कुठे?" साहेबांनी झापले.

००००

सोनोपंतांनी हरणाच्या कातड्याचा कोट विकत घेतला आणि दुकानदाराला विचारले, "काय हो, पावसाळ्यात हा ओला तर होणार नाही ना?"

"मुळीच नाही, अहो, तुम्ही कधी हरणाला छत्री



घेऊन फिरताना पाहिलंय का?" दुकानदाराने विचारलं.

००००

समाप्त

---

## लेखक प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांची अन्य पुस्तके :

❖ बालकथा – गाढव गोष्टी, झंपू, गंमतगोष्टी, संस्कारशील श्याम, गौरीची दिवाळी, ❖ कादंबऱ्या – डेड लॉक, विरह, अपूर्ण संघर्ष, मी अनामिका बोलतेय, दीपशिखा, ❖ कथासंग्रह – दामूअण्णा (विनोदी), ब्यांड मास्तर (उत्कृष्ट कथासंग्रह म्हणून राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त), ❖ काव्य – प्रेम कविता, किलबिलाट (बालकाव्य) (साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित), ❖ अभ्यासात्मक – झटपट शुद्धलेखन, झटपट पत्रलेखन, झटपट मराठी शुद्धलेखन, ठळक शुद्धलेखन, झटपट निबंध, दया पवार, अर्वाचीन मराठी कविता : १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप, बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा, दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा (प्रबंध), ❖ संकीर्ण – धमाल वार्ता, छान छान नावे बाळांची, एका रखेलीची (आत्म)हत्या! (रहस्यकथा), वास्तुशास्त्रातील ठळक संकेत , शनिशिंगणापूर, हसणावळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी, सद्दाम हुसैन, ❖ संपादन – आदर्श (त्रैमासिक हस्तलिखित)(शालेय जीवनात दोन वर्ष चालवलेले नियतकालिक), घरगुती व्यवसाय (शालेय जीवनात केलेले पहिले संपादन), ज्ञानदीप (अमरावती विद्यापीठ शिक्षण महाविद्यालय वार्षिकांक १९९४–९५), ओंजळ (प्राति. काव्यसंग्रह), गंधाली (प्राति. चारोळीसंग्रह), सिंधू (गौरवग्रंथ)

---